मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# एक हजार 190 सदनिकांसाठी ऑनलाईन अर्ज करा

## महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन : आर्थिक दुर्बल घटकांसाठी घरकुल योजना



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत डूडूळगाव येथे १ हजार १९० सदनिका उभारण्यात येत आहेत. त्यासाठी पिंपरी चिंचवड शहरातील रहिवाशी असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र लाभार्थ्यांकडून ३० ऑगस्ट २०२४ पासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी महापालिकेकडे ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले.

केंद्रशासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत डुडुळगाव येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे बांधणे प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतील सदनिकांकरिता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील रहिवाशी असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गात येणाऱ्या नागरिकांकडून दि.३० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२४ पासून मागविण्यात येत आहेत. महापालिकेकडे ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जांची छाणणी करुन लाभार्थी निश्चित करण्यात येणार असल्याचे आयुक्त सिंह यांनी सांगितले.

योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना अटी व शर्ती पूर्तता करणे आवश्यक आहे.. या योजनेसाठी घेण्यासाठी नागरिकांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत असून अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रहिवाशी नागरिक या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करु शकतात, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाअंतर्गत येणाऱ्या अर्जदारांचा कुंटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपर्यंत असावे, अर्जदार किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तींचा नावे भारतात कुठेही घर अथवा मिळकत नसावी, पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत यापुर्वी चऱ्होली, रावेत, बो-हाडेवाडी, पिंपरी व आकुर्डी येथील प्रकल्पांसाठी अर्ज केलेल्या परंतु, सदनिका प्राप्त न झालेल्या व प्रतिक्षा यादीमधील नागरिक नव्याने अर्ज करु शकतात.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत डूडूळगाव येथे उभारण्यात येत असलेल्या प्रकल्पासाठी पुढीलप्रमाणे शासन आणि लाभार्थी यांची भागीदारी असणार आहे. सदनिकेची एकूण किंमत १६ लाख ६४ हजार १७३ रुपये असणार आहे. यामध्ये केंद्रशासन प्रती सदनिका १ लाख ५० हजार रुपये अनुदान देणार असून राज्यशासनाद्वारे प्रती सदनिका १ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. तर लाभार्थी यांना १४ लाख १४ हजार १७३ रुपये प्रती सदनिका स्वहिस्सा भरावा लागणार आहे. पात्र अर्जदारांनी HTTPS://PCMC.PMAY.ORG या सांकेतीक स्थळावर जाऊन अर्ज भरण्याची प्रक्रिया करावी. तसेच प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत राबविण्यात येत असलेल्या या योजनेबाबत अधिक माहितीसाठी महापालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN संकेतस्थळास भेट द्यावी, अशी माहिती उपआयुक्त अण्णा बोदडे यांनी दिली.

### आरक्षणनिहाय माहिती..

» या योजनेअंतर्गत वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकांचे आरक्षण निहाय विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५९५ सदनिका देण्यात येणार असून अनुसूचित जातींसाठी १५५ सदनिका, अनुसूचित जमातीसाठी ८३ सदनिका, इतर मागास प्रवर्गासाठी ३५७ सदनिका राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या आरक्षणनिहाय विभागणी अंतर्गत दिव्यांग नागरिकांसाठी ५ टक्के समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. या येजानेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्जासोबत १० हजार रुपये अनामत रक्कम तसेच ५०० रुपये नोंदणी शुल्क असे एकूण १० हजार ५०० रुपये नागरिकांकडून ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार आहेत. सदनिकांच्या सोडतीमध्ये विजेता न झालेल्या व प्रतिक्षा यादीमध्ये नाव न आलेल्या नागरिकांची अनामत रक्कम योजनेचा अर्ज भरताना नमुद केलेल्या खात्यावर ऑनलाईन पध्दतीने परत करण्यात येणार आहेत.

### आवश्यक कागदपत्रे..

» या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे, पिंपरी चिंचवड, हवेली किंवा मुळशी येथील तहसिलदार यांच्या स्वाक्षरीने असलेला उत्पन्नाचा दाखला(सन २०२३-२४ आर्थिक वर्ष) किंवा १ वर्षाचा इनकम टॅक्स रिटर्न (ITR) किंवा फॉर्म १६/१६अ (सन २०२३-२४ आर्थिक वर्ष) यापैकी एक असणे आवश्यक आहे.
» जात प्रमाणपत्र (अनुसूचित जाती, जमाती, वि.जा.भ.ज., इतर मागासवर्गीय) (फक्त अर्जदाराचे, कुटुंबातील इतर सदस्यांचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही) फक्त महाराष्ट्रातील रहिवासी
» जात वैधता प्रमाणपत्र फक्त अर्जदाराचे (उपलब्ध असल्यास)
» आधार कार्ड (अर्जदार व कुटुंबातील सर्व सदस्यांचे) पिंपरी चिंचवड शहरातील
» पॅनकार्ड (अर्जदार व सह अर्जदार)
» बैंक पासबुक (अर्जदार) पासबुक खाते तपशील पृष्ठ व रद्द केलेला चेक
» मतदान ओळखपत्र (अर्जदार) पिंपरी चिंचवड शहरातील
» भाडे करार (नोंदणीकृत / नोटरी किमान र.रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)
» संमतीपत्र (नातेवाईकांकडे राहत असल्यास त्यांचे किमान र.रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवरील संमतीपत्र) पिंपरी चिंचवड शहरातील, विज बिल (चालु महिन्याचे राहत्या पत्त्यावरील) पिंपरी चिंचवड शहरातील
» अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल दाखला) फक्त महाराष्ट्रातील रहिवासी

# त्या महिला पोलीसाचा अखेर चौथ्या दिवशी मृतदेह सापडला...

## आळंदी पोलीस, आळंदी अग्निशमन विभाग, एनडीआरएफ यांच्या पथकाकडून इंद्रायणी नदीत शोधकार्य सुरु होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आळंदीतील इंद्रायणीनदीत उडी मारून आत्महत्या केलेल्या त्या महिला पोलीसाचा अखेर चौथ्या दिवशी मृतदेह सापडला आहे. अनुष्का सुहास केदार (वय २० वर्षे, रा. लक्ष्मीनारायण नगर, दिघी) असे या पोलीस महिलेचे नाव आहे. संबंधित पोलीस महिलेचा मृतदेह गोलेगाव येथील नदीपात्रात आढळून आला. रविवारी (दि. २५) सायंकाळी सव्वापाचच्या सुमारास केदार यांनी इंद्रायणीनदीच्या नवीन पुलाजवळील गरुड खांबावरून नदीत उडी मारली होती. त्यानंतर आळंदी पोलीस, आळंदी अग्निशमन विभाग, एनडीआरएफ यांच्या पथकाकडून इंद्रायणी नदीत शोधकार्य सुरु होते. अखेर बुधवारी (दि. २८) संबंधित पोलीस महिलेचा मृतदेह गोलेगाव येथील नदीपात्रात आढळून आला आहे. मात्र हे टोकाचे पाऊल उचलण्याचे कारण अद्यापही अस्पष्ट आहे.



अनुष्का केदार या पुणे ग्रामीण पोलीस दलात कार्यरत होत्या. सध्या पुणे ग्रामीण मुख्यालय येथे त्या नेमणुकीस होत्या. रविवारी सायंकाळी सव्वा पाच वाजताच्या सुमारास इंद्रायणी नदीच्या नवीन पुलाजवळ गरुड खांबावरून नदीत उडी मारली. मात्र नदीत उडी मारण्यापूर्वी अनुष्का केदार यांनी देहूफाटा आळंदी येथे राहणाऱ्या त्यांच्या एका मित्राला फोन केला होता. मी इंद्रायणी नदीत उडी मारणार असल्याचे त्यांनी फोनवर म्हटले असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी त्या मित्राला बोलावून घेत त्याची चौकशी सुरु केली.

# हॉटमिक्स नसल्याने खड्डे बुजवा मोहिमेला ब्रेक!

**खड्डे बुजवण्यासाठी आवश्यक असलेले हॉटमिक्स (गरम डांबर आणि खडीचे मिश्रण) उपलब्ध होत नसल्याने महापालिकेच्या खड्डे बुजवा मोहिमेला ब्रेक लागला आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

मुसळधार पावसाने शहरातील रस्त्यांची वाट लावली आहे. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. खड्ड्यांमुळे अपघातांचे सत्र सुरु आहे. त्यात महापालिकेकडून खड्डे बुजवण्याची मोहीम रेंगाळल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. खड्डे बुजवण्यासाठी आवश्यक असलेले हॉटमिक्स (गरम डांबर आणि खडीचे मिश्रण) पथ विभागाला उपलब्ध होत नसल्याची माहिती समोर आली आहे.

त्यावर महापालिकेच्या पथ विभागाने पावसामुळे अडचण येत असली तर महिनाभरात चार हजार सातशे ६६ खड्डे बुजवल्याचा दावा केला आहे.

शहरातील रस्त्यांची अवस्था बघून महापालिकेच्या पथ विभागावर नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. खड्डे बुजवण्यासाठी शहरात कोणी व्हीआयपीच यावा लागतो का, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. व्हीआयपी दौरे असतील तरच शहरातील खड्डे बुजवण्याचे काम हाती घेतले जाते. एरवी खड्ड्यांकडे पाहिलेही जात नाही, हे वास्तव पुणेकर लक्षात आणून देत आहेत.

दरम्यान, महापालिकेच्या पथ विभागाने युद्धपातळीवर शहरातील खड्डे बुजवण्याचे पुन्हा हाती घेतल्याचे सांगितले जात आहे. परंतु प्रत्यक्षात कुठेही खड्डे कमी होताना दिसून येत नाही. उलट खड्डे वाढत असून वाहनचालकांना रस्त्यावरून जाताना मोठी कसरत करावी लागत आहे. शहरात विविध शासकीय संस्थामार्फत आणि पुणे महा पालिकेच्या विविध खात्यांमार्फत पायाभूत सुविधा नागरिकांना पुरविण्यासाठी खोदाईची कामे हाती घेण्यात येतात. या कामांमुळे तसेच गेले अनेक दिवसांनपासून सतत पडत असलेल्या पावसामुळे पडांबरी रस्त्यांवर मोठया प्रमाणात खड्डे पडले आहेत. तसेच गेल्या काही दिवसांपासून पावसाची दमदार हजेरी सुरू आहे. त्यामुळे खड्डे बुजवण्याच्या कामाला मर्यादा येत आहेत.

पुण्यात सध्या पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दौरे सुरु आहेत. दौऱ्यात मंदिरात किंवा इतर ठिकाणी घाण, कचरा अथवा काम योग्य झाले नसेल तर तत्काळ संबंधित व्यक्तीची कानउघडणी केली जाते. पण याच पालकमंत्र्यांना पुण्याच्या रस्त्यांवर पडलेले खड्डे का दिसत नाहीत, असा प्रश्न पुणेकरांनी उपस्थित केला आहे. पुणे महापालिकेच्या प्रशासनाचे जोवर बड्या राजकीय नेत्यांकडून किंवा मंत्र्यांकडून कान टोचले जात नाही, तोवर प्रशासन काम करत नाही,



### येरवड्यातील हॉटमिक्स प्रकल्प कालबाह्य

» खड्डे बुजवण्यासाठी हॉटमिक्स मिळण्यास अडथळा येत असून वेळेवर मिळत नसल्याने खड्डे बुजवण्याचे काम संथ गतीने सुरु आहे. येरवड्यातील हॉटमिक्स प्रकल्पात दिवसाला सुमारे दोनशे टन हॉटमिक्स तयार केले जाते. त्याच्या उपयोगाने रस्ते दुरुस्ती चांगली होते. मात्र, सततच्या पावसामुळे हॉटमिक्स प्रकल्पासाठी आणलेली खडी ओली होत आहे. त्यामुळे डांबर आणि खडी एकजीव होत नसल्याने रस्ते वारंवार उखडत आहेत. त्यातच महापालिकेने ठेकेदार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडे या हॉटमिक्सची मागणी केली असली, त्यांच्याकडे ते उपलब्ध नाही.

### 4,766 खड्डे बुजवल्याचा पथ विभागाचा दावा

» शहराच्या विविध भागातील रस्त्यांचा दैनंदिन सर्व्हे केला जातो. त्यात ३ ऑगस्ट ते २७ ऑगस्टदरम्यान ४,७८९ खड्डे आढळून आले. हे खड्डे बुजवण्याचे काम हाती घेण्यात आले असून आतापर्यंत ४,७६६ खड्डे बुजवण्यात आले आहेत. दरम्यान, प्रत्येक भागातील अधिकारी रस्त्याची दैनंदिन पाहणी करुन त्यावर पडलेल्या खड्ड्यांची माहिती घेत आहेत. नंतर ते बुजवले जात आहेत. पावसामुळे नव्याने खड्डे पडत आहेत. त्याचबरोबर नागरिकांनी केलेल्या तक्रारींची दखल घेऊनही खड्डे बुजवले जात आहेत. गणेशाचे आगमन होण्यापूर्वी शहरातील सर्व खड्डे बुजवले जाणार आहेत.

> महापालिकेकडून खड्डे बुजवण्याचे काम केले जात आहे. मात्र, पावसामुळे त्याला अडथळे येत आहेत. आता गणपतीचे आगमन होणार असल्याने पुन्हा खड्डे बुजवण्याची मोहीम वेगाने राबविण्यात येईल. गणपती विसर्जन झाल्यानंतरदेखील खड्डे बुजवण्याची मोहीम राबविली जाईल.
>
> **- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.**

# थेरगावमध्ये आम आदमी पार्टीकडून राज्य सरकारचा जाहीर निषेध

**छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ थेरगाव शिवाजी पुतळ्या समोर महाराष्ट्र सरकारच्या अक्षम्य दुर्लक्ष विरोधात जाहीर निषेध नोंदविण्यात आला.**

**पुणे | प्रतिनिधी**

आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मालवण येथील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ डांगे चौक थेरगाव शिवाजी पुतळ्या समोर महाराष्ट्र सरकारच्या अक्षम्य दुर्लक्ष विरोधात जाहीर निषेध नोंदविण्यात आला.




त्यावेळी पिंपरी चिंचवड शहराच्या आम आदमी पार्टीच्या अध्यक्षा मीनाताई जावळे यांनी तीव्र भाषेत निषेध नोंदविला. तसेच चेतन बेंद्रे पदवीधर आघाडी महाराष्ट्र राज्य व संतोष इंगळे उद्योग आघाडी सचिव महाराष्ट्र राज्य यांनी तीव्र भाषेत निषेध नोंदविण्यात आला. यावेळी पक्षाचे कार्यकर्ते रविराज काळे, वैजनाथ शिरसाठ ब्रह्मानंद जाधव सुरेश बावनकर अजय सिंग, रोहित सरनोबत, गायकवाड सर, सरोज कदम, भारती जाधव दमयंती नेरकर, सीमा बावनकर, सचिन थोरात, जावळे मामा, व पक्षाचे सर्व कार्यकर्ते या आंदोलनास उपस्थित होते. हे आंदोलन पिंपरी चिंचवड शहराच्या अध्यक्ष मीनाताई जावळे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.

# पीएमआरडीएत आता बदल्यांना वेग

## दहा कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कारवाईनंतर काढले आदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर क्षेत्रीय विकास प्राधिकरणाच्या ( पीएमआरडीए) १६ कंत्राटी अभियंत्यांवर कारवाई केल्यानंतर विविध विभागात फेरबदल केले आहेत. प्राधिकरणाच्या विकास परवानगी, अतिक्रमण आणि अभियांत्रिकी या विभागातील दहा कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आलेले आहेत. प्रशासनाकडे काही तक्रारी प्राप्त झाले असून त्याची शहानिशा केल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

भ्रष्टाचार आणि पैशाच्या मागणीच्या कारणावरून पीएमआरडीए अंतर्गत १६ कंत्राटी अभियंत्यांच्या सेवा संपुष्टात आणल्या. तर, त्यानंतर १० कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. संगणक चालक, शिपाई आणि लिपिकांचा त्यात समावेश आहे. प्रामुख्याने विकास परवानगी विभाग आणि अभियांत्रिकी विभाग यामधील कर्मचाऱ्यांचा त्यात समावेश आहे. दरम्यान, आणखी काय तक्रारी प्रशासनाकडे करण्यात आलेल्या आहेत, या अनुषंगाने चौकशी सुरू असून कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. विकास परवानगी विभागात देखील काही बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार त्या विभागातील संगणक चालक, लिपिक आणि



शिपाई देखील बदलण्यात आले आहेत. त्यांची इतर विभागात बदली करण्यात आली आहे. अतिक्रमण पथकातील जवळपास दहाहून अधिक कर्मचारी काढून टाकल्यानंतर अवघे कंत्राटी कर्मचारी उरले आहेत. इतर विभागात देखील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिले आहेत. जमीन, मालमत्ता आणि नियोजन विभागात कोणता बदल केला नाही. मात्र, त्या संबंधित माहिती घेण्यात येणार आहे.

### 16 कर्मचाऱ्यांची चौकशी समिती

**» तक्रारीनंतर सेवा संपुष्टात केलेल्या १६ कर्मचाऱ्यांची चौकशी पीएमआरडीएकडून सुरू आहे. तक्रार निहाय त्या कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू असून, या पाठीमागे अन्य कोणत्या अधिकाऱ्याचा हात आहे का त्याचा तिथे तपास सुरू आहे. दरम्यान, त्याबाबत चौकशी समिती नेमली असून, अतिक्रमण विभाग प्रमुख तथा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या अंतर्गत चौकशी सुरू आहे. तसेच, संबंधित ठेका असलेलं कंपनीला खुलासा देखील मागवला आहे.**

### पाच वर्षे झालेल्या अधिकाऱ्यांची नावे कळवली

पीएमआरडीएमध्ये चार ते पाच अधिकारी यांची पाच वर्षे उलटूनही येथून बदली झालेली नाही. राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीवर ते या ठिकाणी रुजू झाले होते. संबंधित अधिकारी हे त्या त्या विभागाचे प्रमुख आहेत. तर, काही अधिकाऱ्यांकडे विशेष जबाबदारी देखील देण्यात आली आहे. याबाबतची माहिती राज्य शासनाकडे पाठवली असल्याचे सांगण्यात आले आहे.

# नागरिकांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन

## केवळ शाडूच्या मूर्ती विक्रीस मान्यता : कारागिरांना देणार प्रायोगिक तत्वावर निशुल्क माती

**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेशोत्सव व नवरात्रोत्सवाच्या काळात शहरातील मूर्ती तयार करणारे कारागीर, मूर्तिकार तसेच उत्पादकांनी केवळ शाडू मातीच्या मुर्तीची निर्मिती आणि विक्री करावी. नागरिकांनीही केवळ पर्यावरणपूरक शाडू मातीच्या नैसर्गिक रंग वापरून तयार केलेल्या आणि पाण्यात सहज विरघळणाऱ्या मुर्त्या, पर्यावरणपूरक सजावटीचे पूजा साहित्य वापरून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.



महानगरपालिका आणि शहरातील नागरिकांनी नेहमीच पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यास प्राधान्य दिले आहे. आपले पिंपरी-चिंचवड पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित राहील याची दक्षता घेण्याची जबाबदारी ही शहरातील प्रत्येक नागरिकाची आहे. त्यादृष्टीने नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पीओपी मूर्ती उत्पादनांवर बंदी घालण्यात आली आहे.

त्यामुळे महापालिका कार्यक्षेत्रातील मूर्ती बनवणारे कारागीर, मूर्तिकार व उत्पादक यांना पीओपी पासून मूर्ती बनवण्यावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच महापालिका कार्यक्षेत्रात केवळ पर्यावरणपूरक मूर्तीचे उत्पादन व विक्री करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महापालिकेच्या उद्योगधंदा व परवाना विभागाशी संपर्क साधून गणेशमुर्ती स्टॉलबाबत परवानगी घेऊन परवानगीची १ प्रत पर्यावरणपूरक मूर्ती विक्रीचे दुकान किंवा स्टॉलच्या दर्शनी भागात लावणे बंधनकारक असणार आहे, असे पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी महापालिकेने घेतला पुढाकार

भारत सरकाच्या केंद्रीय पर्यावरण वने वातावरणीय बदल विभागाच्या वतीने केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने १२ मे २०२० रोजी मूर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केलेली आहेत. त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम १९७४ तसेच उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव २०२४ बाबत मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात श्री गणेशाची मूर्ती या नैसर्गिक, पर्यावरणपूरक जैव विघटक पदार्थापासून तयार करण्यात येतील, ज्या प्लास्टीक, थर्माकॉल, पीओपी, स्टेपलर, प्लास्टिक मणी पासून मुक्त असतील, अशा मूर्तींना प्रोत्साहन दिले जाईल, मात्र पीओपी पासेन तयार करण्यात आलेल्या मूर्तींना बंदी असेल. सर्व मूर्तींचे

### ..अन्यथा कारवाई अटळ

**» सन २०२४ च्या सार्वजनिक गणेशोत्सवासंदर्भात वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे उल्लंघन झाल्यास पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ अन्वये, संबंधित मुर्तिकार कारवाईस पात्र ठरतील. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे अंमलबजावणीचे हक्क महापालिका तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे राहील. तसेच संबंधितांविरुद्ध नागरिकांना सनद २००० मधील परिशिष्ट ४ संदर्भ क्र. ०६ नुसार महापालिका क्षेत्रातील जल, वायू, ध्वनी प्रदुषणाबाबत कारवाईचे अधिकार महापालिका आयुक्त यांचे राहतील.**

विसर्जन कृत्रिम तलावात, रहिवासी संकुलातील टाकीमध्ये करणे अथवा महापालिकेच्या मूर्ती स्विकृती केंद्रामध्ये देणे बंधनकारक आहे.

मूर्तीकारांना मूर्ती घडवण्यासाठी, विक्रीसाठी तसेच साठवणूकदारांसाठी मंडप उभारण्यासाठी प्रभाग कार्यालयामार्फत परवानगी घेणे बंधनकारक राहील. सदर परवानगीची प्रत त्यांनी मंडपात दर्शनी भागात प्रसिद्ध करायची आहे. पर्यावरणपूरक साहित्य, शाडू मातीने मूर्ती घडवणाऱ्या मूर्तीकारांना या वर्षी प्रायोगिक तत्वावर उपलब्धतेनुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर शाडू मातीची मागणी केल्यास निःशुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल. मात्र ते स्वतः मूर्तीकार असणे बंधनकारक आहे.

से हमीपत्र सही करुन आपल्या मंडपाच्या ठिकाणी किंवा दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. पर्यावरण पूरक साहित्य, शाडू मातीची मूर्ती घडविणाऱ्या मूर्तीकारांनी त्यांच्या मंडपाबाहेर पर्यावरणपूरक साहित्याने घडवलेल्या मूर्ती उपलब्ध आहेत अशा आशयाचा ३ बाय ५ फूट एवढ्या आकारमानाचा फलक लावणे बंधनकारक आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या मूर्तीकार, साठवणूकदार, विक्रीकर व हमीपत्र भरुन दिलेल्या कडून प्राधान्याने पूजा व उत्सव मंडळाने मूर्ती प्राप्त करुन घ्यावी, असे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे.

# पावसामुळे शहरातील हजारांहून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बंद

## शहरात 2 हजार 900 सीसीटीव्ही कॅमेरे असून यातील एक हजार 54 सीसीटीव्ही कॅमेरे बंद



**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांवर अहोरात्र नजर ठेवणारा आणि महापालिकेने बसवलेला तिसरा डोळा म्हणजे सीसीटीव्ही कॅमेरे. हे कॅमेरे सध्या बंद पडले आहेत. शहरात २ हजार ९०० सीसीटीव्ही कॅमेरे असून यातील एक हजार ५४ सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. हे कॅमेरे पावसामुळे बंद पडले असून वादळी वाऱ्यात अनेक कॅमेऱ्यांच्या केबल तुटल्या आहेत. कॅमेरे पालिकेने बसवले असले तरी ते पोलीस ठाण्यांना जोडलेले आहेत. यामुळे कॅमेरे दुरुस्त कोणी करावयाचे हाही प्रश्न आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हे कॅमेरे तात्काळ दुरुस्त करणे गरजेचे आहे. धक्कादायक बाब म्हणजे कॅमेऱ्यांची देखभाल, दुरुस्ती करण्यासाठी पालिकेकडे आर्थिक तरतूदच नाही.

शहरात यावर्षी होत असलेल्या मुसळधार पावसाने पुणेकरांना चांगलेच जेरीस आणले आहे. धरणसाखळी क्षेत्रात दमदार पाऊस होत असल्याने कधी धरणातून सोडलेले पाणी नागरी वस्तीत शिरेल याची धास्ती असताना आता पावसाने पुण्याचा तिसरा डोळाच बंद पडला आहे. यामुळे चोरी आणि अन्य गुन्ह्यांना मोकळे रान मिळू शकते. शहरातील नागरिकांच्या काळजीसाठी सीसीटीव्ही कॅमऱ्यांची मदत होईल, वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण आणता येईल, तसेच कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहतूक कोंडी सुरळीत करता येईल अशा उद्देशाने महापालिकेने हजाराहून अधिक कॅमेरे बसविले आहेत. आता या कॅमेऱ्यांची देखभाल, दुरुस्ती महापालिकेकडून केली जात नसल्याचे समोर आले आहे. रस्त्यावर बसविलेल्या कॅमेऱ्यांची दुरुस्ती महापालिका कशी करणार असाही प्रश्न आता पथ विभागाला पडला आहे. तसेच याची दुरुस्ती पालिकेने करावी की पोलिसांनी करावी असाही मोठा प्रश्न आहे. सीसीटीव्ही कॅमेरा दुरुस्तीबाबत संभ्रमाच्या स्थितीमुळे सुरक्षा धोक्यात आली आहे. त्यामुळे यावर गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे पुणेकरांचे म्हणणे आहे.

महापालिकेने नगरसेवकांच्या निधीतून शहराच्या अनेक भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. त्यानंतर पालिकेत गेल्या तीन वर्षांपासून प्रशासकराज सुरु आहे. त्यामुळे पालिकेच्या तिसऱ्या डोळ्याकडे कोणाचेच लक्ष नसल्याचे बोलले जात आहे. हे कॅमेरे हे संबंधित पोलीस ठाणे किंवा चौकीतील कंट्रोल रुमशी जोडले गेले आहे. चार वर्षांपूर्वी हे कॅमेरे बसविण्याचे प्रमाण अधिक होते. त्याचा सुरुवातीच्या कालावधीत पोलिसांना उपयोग झाला. अनेक गुन्ह्यांचा माग काढण्यात कॅमेरे महत्वाचे ठरले. आता हे सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत आहे.

शहरातील गणेशोत्सव जगात प्रसिध्द आहे. त्यामुळे गणेश भक्तांची मोठी गर्दी होते. त्यापार्श्वभूमीवर पुणे पोलिसांकडून शहराच्या कानाकोपऱ्यात कॅमेरे बसविलेले आहेत. प्रत्येक कॅमेऱ्यातील हालचालीवर पोलिसांकडून बारीक लक्ष ठेवले जाते. गणेशोत्सवात मोबाईल, सोनसाखळी चोरी, पाकीट चोरीचे गुन्हे वाढतात. त्यामुळे सुरक्षिततेसाठी तसेच गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यासाठी या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती आवश्यक आहे. महापालिकेने कोणाची वाट न पाहता तातडीचा निधी म्हणून कॅमेरे दुरुस्त करण्यासाठी आर्थिक तरतूद करावी, अशीही मागणी पुणेकरांनी केली आहे. मध्यभागात संभाजी पोलीस चौकी, नारायणपेठ पोलीस चौकी, शनिवार पेठ, खडक, सेनादत्त, मंडई, मिठगंज, पेरुगेट, कसबा पेठ, ताडीवाला रोड पोलीस चौकी कार्यक्षेत्राचा समावेश आहे. विशेष म्हणजे गणेशोत्सवात याच चौकींच्या भागात मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. याच चौकींच्या भागातून गणेश विसर्जन मिरवणुक मार्गस्थ होत असते.

### गॅरंटी संपलेले 571 कॅमेरे सुरु

» २०१९ ते २०२१ या कालावधीत १ हजार ५४६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते. त्याची गॅरंटी संपली असली तरी ५७१ कॅमेरे सुरु आहेत यातील ९७५ कॅमेरे बंद आहेत.

### वॉरंटीमधील 79 कॅमेरे बंद

» २०२२ ते २०२४ या काळात १ हजार ३६३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. यातील १ हजार २८४ कॅमेरे सुरु असून, ७९ कॅमेरे बंद आहेत

# गणेशमूर्ती दान करा, तीन किलो खत मिळवा

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव : 15 हजार नागरिकांना मिळणार खताची पिशवी भेट



**पुणे | प्रतिनिधी**

सामाजिक एकात्मतेचे प्रतीक असलेला गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्यासाठी महापालिकेने पुणेकरांना साद घातली आहे. गणेशोत्सवात जे भाविक महापालिकेकडे गणेशमूर्ती दान करतील, त्यांना प्रत्येकी तीन किलो सेंद्रीय खत दिले जाणार आहे. महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांवर ही सुविधा उपलब्ध असेल. तसेच क्षेत्रीय कार्यालय स्तरावर प्रत्येकी एक हजार या प्रमाणे १५ हजार नागरिकांना ही खताची पिशवी भेट दिली जाणार आहे.

शहरातील उरुळी देवाची येथील प्रक्रिया प्रकल्पातील हे खत असेल. "भूमीग्रीन एनर्जी' या कंपनीकडून हे खत भेट दिले जाणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., उपायुक्त संदीप कदम यांनी क्षेत्रीय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांची, स्वच्छता कर्मचारी, आरोग्य निरीक्षकांची बैठक घेतली. या बैठकीत गणेशोत्सवातील स्वच्छता तसेच पर्यावरणपूरक उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. गणेशोत्सवात गर्दीमुळे कचरा वाढतो. हा कचरा उचलला न गेल्याने शहर अस्वच्छ होते. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने त्यांच्या हद्दीत तीन पाळ्यांमध्ये परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कर्मचारी नियुक्त करावेत. नागरिकांकडून उघड्यावर कचरा फेकला जातो, अशा "क्रोनिक्स स्पॉट'वर लक्ष ठेवून कचरा फेकण्यावर प्रतिबंध करावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या आहेत.

> गणेशोत्सवात शहर स्वच्छ असावे, नागरिकांना चांगली सुविधा मिळावी यासाठी बैठकीत सूचना देण्यात आल्या आहेत. उत्सव कालावधीत प्लॅस्टिक व थर्माकोलच्या वस्तूंवर प्रतिबंध असल्याने त्या विरोधातील कारवाई तीव्र केली जाणार आहे.
> - संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग.

### निर्माल्य संकलनाची विशेष सुविधा

» गणेशोत्सवातील निर्माल्य नदीत न सोडता नागरिक तसेच मंडळांनी महापालिकेकडे द्यावे, यासाठी विशेष सुविधा निर्माण केली जाणार आहे. त्या अंतर्गत संकलित केलेल्या निर्माल्याचे खत तयार केले जाणार आहे. शेतकरी तसेच शहरातील नागरिकांना ते मोफत दिले जाणार आहे.